# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी,२०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सर्व समाज कार्य महाविद्यालय समाज कल्याण विभागाकडून सन २०२४ मध्ये उच्च शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येणे, समाज कल्याण विभागाकडे हे सर्व महाविद्यालय असतांना शिक्षक व शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध वेळोवेळी मंजूर करण्यात येत असणे, परंतु दोन वर्षापासून समाज कल्याण विभागाकडून उच्च शिक्षण विभागाकडे हस्तांतरण होऊनसुध्दा अद्याप आकृतीबंध मंजूर करण्यात आला नसणे, राज्यातील समाज कार्य महाविद्यालय मध्ये २७१ पेक्षा अधिक शिक्षकांची पदे रिक्त असणे, तसेच शेकडो पेक्षा अधिक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील रिक्त पदे भरण्याकरिता शासन निर्णय निर्गमित केला असणे, परंतु या शासन निर्णयामध्ये समाज कार्य महाविद्यालयाचा उल्लेख नसल्यामुळे राज्यातील समाज कार्य महाविद्यालयामध्ये नजिकच्या काळात मोठ्या प्रमाणात शिक्षक पदे रिक्त असल्यामुळे समाज कार्य महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्तेचा व अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला असणे, तेव्हा राज्यातील सर्व अनुदानित समाज कार्य महाविद्यालय उच्च शिक्षणाच्या अधिपत्याखाली येत असल्याने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ च्या शासन निर्णयामध्ये समाज कार्य महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली २७१ शिक्षक पदे

भरण्याकरिता शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हिंगोली जिल्ह्यातील औढा–वसमत रोडवरील शिराड शहापूर हे गांव जवळा बाजारापासून १२ कि.मी. वर असणे, हमरस्त्यावर असलेल्या या गावातील टेकडीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जाणे, टेकडी खोदून तेथील माती, दगड आणि अन्य खनिजे ट्रकचे ट्रक भरुन वाहून नेले जाणे, त्यामुळे निसर्गाच्या संतुलनाच्यादृष्टीने मौल्यवान असलेली टेकडी नष्ट करण्याचा प्रयत्न केला जाणे, उत्खननाचे गैरकृत्य पार पाडणाऱ्या कंत्राटदाराच्या नोकराची या बेकायदेशीर कृत्यावर देखरेख असणे, सोबतच पूर्णा व कयादू नदीपात्रातील वाळूचा अनधिकृत उपसा करुन, नदीतील खडकापर्यंत वाळूचा उपसा करुन नदीचे पात्र असुरक्षित बनविणे आणि हे सर्व गैरप्रकार सुरु असतांना निम्नस्तरीय शासकीय यंत्रणेचे या अवैध उत्खननाकडे आणि वाळूच्या उपशाकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे पर्यावरणाची होत असलेली कधीही भरुन न निघणारी हानी आणि पशुपक्षांसह मानव जातीच्या अस्तित्वाला यामुळे निर्माण होणारा संभाव्य धोका, सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर ही वैद्यकीय संस्था ७० वर्षापुर्वी स्थापित झाली असणे, या वैद्यकीय संस्थेत मराठवाडयासह विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांशी रुग्ण हे वैद्यकीय उपचारासाठी येत असणे, रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचार व भौतिक सुविधा मिळण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेस अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) दर्जा मिळाला तर या वैद्यकीय संस्थेस दोन ते तीन हजार कोटीचे अतिरिक्त अर्थसहाय्य मिळू शकते आणि या निधीतून वैद्यकीय संस्थेस सेवा सुविधांचा स्तर व गुणवत्ता उच्च पातळीवर नेण्यास सुलभ होणार असणे, वैद्यकीय संस्थेची विविध वसतिगृहे जुनी व अपुरी असल्याने सध्याच्या २१०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उपलब्ध होणार असणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे ऑल इंडीया इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस (एम्स) दर्जा मिळण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक

ती कार्यवाही करावी यासाठी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.हेमंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नांदेड जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.यशवंत राजपाल पाटील यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून पात्र कर्मचाऱ्यांना अपात्र ठरवणे व अपात्रांना पात्र ठरविणे, तसेच विविध प्रशासकीय बाबींमध्ये नियमबाह्य निर्णय घेऊन गंभीर आर्थिक व प्रशासकीय अनियमितता केल्याच्या तक्रारी समोर येणे, या संदर्भात स्थानिक आमदारांनी आयुष संचालनालयाकडे लेखी तक्रार सादर करणे, संबंधित अधिकाऱ्यांशी असलेल्या कथित संबंधांचा प्रभाव वापरून प्रक्रियेत हस्तक्षेप झाल्याचा आरोप होणे, यामुळे महाविद्यालयाची शैक्षणिक प्रतिमा व प्रशासनाची पारदर्शकता धोक्यात येणे, ही अत्यंत गंभीर बाब असून सदर प्रकरणाची दखल घेऊन वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले असले तरी, चौकशीची व्याप्ती, कालमर्यादा व दोषींवर होणारी कारवाई याबाबत स्पष्टता नसल्याने शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.वसंत खंडेलवाल, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोला शहरांमधून वाहणाऱ्या मोर्णा नदीवर सन १९७० मध्ये मोर्णा प्रकल्प व विद्रुपा नदीवर सन २००६ मध्ये दगडपारवा प्रकल्प बांधण्यात आलेला असणे, अकोला शहरात सन १९९८ मध्ये पूर संरक्षण भिंत अपूर्ण बांधल्यानंतर पारंपारिक पद्धतीने लाल / निळी पुररेषेची आखणी केलेली असणे, सन २०२२-२३ मध्ये जलसंपदा विभागाअंतर्गत पाटबंधारे विभाग, अकोला यांच्याकडून निविदा प्रक्रिया पूर्ण करून DGPS, DRONE पद्धतीने सर्वेक्षण करून लाल / निळी पुर रेषेची आखणी शासनाच्या संकेतस्थळावर सन २०२३ मध्ये प्रसिद्ध केलेली असणे, परंतु पूर्वानुभव नसलेल्या कंत्राटदाराकडून वास्तविकतेच्या आधारे चौकशी न करता चुकीच्या पद्धतीने आखणी केलेली असणे, पूर अभ्यास करताना पंचवीस वर्षाचा व शंभर वर्षात येणाऱ्या पुराचा अभ्यास करून किंवा नदीच्या दीडपट वहन क्षमता विचारात घेऊन निळी लाल पुररेषेची आखणी करणे अभिप्रेत असताना या बाबीचा

विचार झालेला नसणे, त्यामुळे सन २०२३ पूर्वी त्या भागात मंजूर नकाशानुसार घरे बांधणाऱ्या अकोला शहरातील ३०,००० कुटुंब बाधित होऊन अन्यायग्रस्त बाधित कुटुंबियांमध्ये शासनाविषयी प्रचंड असंतोष पसरणे व चिडीची भावना निर्माण झालेली असणे, या सर्व बाबींचा विचार करून सन २०२३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या लाल / निळी पुर रेषेची केलेली चुकीची आखणी तात्काळ रद्द करून अनुभवी कंत्राटदाराकडून नव्याने लाल / निळी पूर रेषांची आखणी करण्याकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री सदाशिव खोत, पंकज भुजबळ, अमोल मिटकरी, इद्रिस नायकवडी **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे येथील क्षयरोग रुग्णांच्या उपचारासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेली केंद्र सरकारची निक्षेय पोषण योजना निधी अभावी अडचणीत सापडली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास येणे, उपचार काळात पोषणासाठी दरमहा १००० रुपयाची आर्थिक मदत देण्यासाठी निक्षय योजना शहरात पूर्णपणे राबवली जात नसल्याने सुमारे ७० टक्के क्षयरोग रुग्ण लाभापासून वंचित राहिले असणे, महापालिकेला राज्य आणि केंद्र शासनाकडून वेळेवर निधी न मिळाल्याने रुग्णांची ससेहोलपट होत असणे, सन २०२५ मध्ये राज्यात २ लाख १९ हजार ३१५ नवीन टीबी रुग्ण नोंदवले गेले मात्र त्यापैकी केवळ ६२ हजार १९४ रुग्णांना (३२% निक्षय) पोषण योजनेचा लाभ मिळाला त्यामुळे ६८% टीबी रुग्णांना निक्षय योजनेचा लाभ मिळत नसल्याने या रुग्णांना मोठ्या समस्या येत असणे, त्यामुळे नोंदवल्या गेलेल्या सर्व रुग्णांना तातडीने निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस मुख्यमंत्र्यांचे उत्तर -**

**सात : मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमातील नियम २३० (२) मधील तीन दिवसांच्या

कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी"

**आठ : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस) खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१) उप मुख्यमंत्री (नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), गृहनिर्माण)

२) उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्प संख्यांक विकास व औकाफ)

३) महसूल मंत्री

४) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री

५) वैद्यकीय शिक्षण मंत्री

६) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री

७) वने मंत्री

८) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

९) शालेय शिक्षण मंत्री

१०) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री

११) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री

१२) आदिवासी विकास मंत्री

१३) कृषी मंत्री

१४) महिला व बालविकास मंत्री

१५) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

१६) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री

**नऊ : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

**(क)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

दहा : (क) **श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले,** यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"राज्यातील शेतक-यांना सरसकट व संपूर्ण कर्जमाफी, मोफत वीज पुरविणे, शेतमालाला हमीभाव देणे इत्यादी घोषणांचा शासनाने पाऊस पाडणे, त्यातच शेतकरी अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट या निसर्गकोपामुळे उद्‌ध्वस्त होणे, अद्यापही शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याने त्यांच्यावर दुहेरी संकट ओढवणे, पीक विमा कंपन्या कडून शेतक-यांना अत्यल्प नुकसान भरपाई मिळणे, १ रुपयात

पिक विमा ही योजना शेतक-यांसाठी कि कंपन्यासाठी याबाबत संशय निर्माण होणे, दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उदयोग राज्यात उभारला नसणे, परंतु टाटा एअर बस, वेदांता, सॅफ्रेन इत्यादी अनेक मोठे प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीचा केवळ फुगवटा निर्माण करणे, कौशल्य विकास केंद्राच्या आकडेवारीनुसार राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद होणे, राज्यात गतवर्षामध्ये मंत्री महोदयांवर भ्रष्टाचाराचे आरोप होवूनही कुठलीही कार्यवाही झाली नसल्याने आता त्यांच्या दालनापर्यंत लाचखोरीचे प्रकरण पोहचले असणे, तथापि शासन अशा मंत्री महोदयांना अभय देत आहे, भ्रष्टाचाराचा नवीन प्रकार शासनामध्ये सुरु झाला असे, निविदा काढणे, किरकोळ निधी उपलब्ध करुन देणे व ठेकेदाराची देयके थकविणे या प्रकरणी अनेक ठेकेदारांनी आंदोलने व आत्महत्या करणे, शिक्षकांचे विविध प्रश्न प्रलंबित असणे, शासन विकासाच्या गप्पा मारत असून नियोजन शून्यतेमुळे मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प झाली व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६, बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** --

**सर्वश्री प्रविण दरेकर, हेमंत पाटील, विक्रम काळे, सदाशिव खोत, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, सर्वश्री सतिश चव्हाण, दादाराव केचे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, डॉ. परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, अमोल मिटकरी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री संजय केणेकर, संदीप जोशी, वसंत खंडेलवाल, प्रसाद लाड, अमरिशभाई पटेल, ॲड. निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, वि.प.स.** यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतक-याला जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतक-यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांतून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांमुळे शेडयुल १ मधून शेडयुल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, सन २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

**अकरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"सावंतवाडी, दोडामार्ग, वेंगुर्ले तालुक्यामध्ये (जि.सिंधुदुर्ग) डेव्हलपमेंट झोन येणार असल्याने शासन जमिनी संपादीत करणार असल्याचे सांगुन स्थानिक शेतकरी व बागायतदारांकडून त्यांच्या मोक्याच्या जमिनी नाममात्र दराने विकत घेतल्या जात असल्याचे प्रकार वाढत असून यामध्ये येथील काही

मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार सक्रीय झाले असणे, यामुळे येथील स्थानिक शेतकरी व बागायतदार भूमिहीन होत असल्याने गाव सोडून जात असणे, याबाबत शासनाने तातडीने माहिती घेवून येथील मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार तसेच त्यांच्याशी संगनमत करणारे संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज असणे व स्थानिक शेतकऱ्यांना भूमिहीन होण्यापासून रोखण्याची आवश्यकता असणे याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, सतिश चव्हाण, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील वातावरणातील हवामान बदलांमुळे तसेच पाऊसाच्या अनियमिततेमुळे शेतीवर विपरित परिणाम होत असल्याने पिकांच्या उत्पादकतेमध्ये घट होऊन उत्पादनांचा दर्जादेखील खालावत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असणे, राज्यात मागील काही वर्षांत अतिवृष्टी तसेच पुरांमुळे लाखो हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले असणे, त्याचप्रमाणे शेतजमीन, विहीर, शेततळी आणि पशुधनाच्या नुकसानीसह जिवित व वित्तहानी झालेली असणे, हवामानातील बदलामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असणे, जागतिक तापमान वाढीच्या परिणामाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना सोसावा लागत असल्याने या संपूर्ण बाबींचा विचार करतां नैसर्गिक संकटांवर मात करीत असतांना अन्य उपायांसोबत कृषी संशोधनाची दिशा बदलण्याची गरज असणे याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**विधान भवन :**<br>मुंबई,<br>दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,<br>सचिव-३,<br>महाराष्ट्र विधानपरिषद.